# बॉम्बे प्रेसिडेन्सीमधील काही दुर्लक्षित स्त्रियांचे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील योगदान

**कु. समृद्धी रमेश माने**
बी. ए . तृतीय वर्ष (इतिहास)
विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर.
samruddhimane966@gmail.com

**गोषवारा:**

भारतीय स्वातंत्र्यलढा ही एक बहुआयामी घटनांची शृंखला आहे. भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी कामगार चळवळी, क्रांतीकारी चळवळी व समाजसुधारणा चळवळी व स्त्रीचळवळीचे महत्वपूर्ण योगदान आहे. परंतु भारताला स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या महिला स्वातंत्र्यवीरांचा, महिला क्रांतीकारक, महिला समाजसुधारक यांचा उल्लेख तुलनेने कमी आढळतो. भारतीय स्वातंत्र्य लढ्यामध्ये पुरुषांइतकेच स्त्रियांचेही योगदान महत्त्वाचे असताना त्यांच्या योगदानाची दखलही घेतली जात नाही हे दुर्दैव म्हणावे लागेल. गांधीजींच्या विचाराने प्रभावित होऊन अनेक स्त्रिया या राजकारण व समाजकारणात सहभागी झाल्या. भारतीय स्वातंत्र्यलढ्यात इतर प्रांतांचा विचार करता मुंबई इलाख्यातील महिला या गांधीवादी चळवळीमध्ये अग्रेसर होत्या असे म्हणावे लागेल. मुंबई प्रांतातील मिठुबेन पेटिट, सुमती मोरारजी, मणिबेन पटेल, जयश्री रायजी आणि उषा मेहता या महिलांचे स्वातंत्र्यामधील योगदान महत्त्वपूर्ण आहे. प्रस्तुत शोध निबंधातून बॉम्बे प्रेसिडेन्सीमधील उपरोक्त काही दुर्लक्षित स्त्रियांचे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील योगदानाचा अभ्यास केला जाणार आहे.

**कळीचे शब्द :** स्वातंत्र्यलढा, बहुआयामी, कामगार चळवळी बॉम्बे प्रेसिडेन्सी...

**प्रस्तावना:**

भारताला स्वातंत्र्य प्राप्त होऊन 75 वर्ष पूर्ण झाले ही एक भारतीय म्हणून अभिमानासपद गोष्ट आहे 'आझादी का अमृतमहोत्सव' साजरा करत असताना 75 वर्ष मागे जाऊन इतिहासात डोकावले तर स्वातंत्र प्राप्तीसाठी झालेला स्वातंत्र्य संग्राम आजही रोमांचित करणारा आहे. जगातील इतर कोणत्याही देशाचा स्वातंत्र्यसंग्रामाचा इतिहास हा भारता इतका समृद्ध नसावा. व्यापारी म्हणून आलेले परकीय पुढे 'फोडा आणि राज्य करा' या नीतिचा अवलंब करून राज्यकर्ते बनले भारतातील सामान्य लोक, आदिवासी, शेतकरी यांच्यावर अमानुष कर पद्धती लादली यातूनच अन्यायाचे स्वरूप उग्र होऊन सामान्य जनता आपल्या अन्यायाच्या विरुद्ध स्वातंत्रसंग्रामात सामील झाली. मंगल पांडे पासून ते चाचा नेहरू पर्यंत झाशीची राणी लक्ष्मीबाई पासून ते इंदिरा गांधी पर्यंत प्रत्येकाने आपले अमूल्य योगदान भारत स्वातंत्रप्राप्तीसाठी दिले.

परंतु आज भारताचा अमृत महोत्सव साजरा करत असताना एक गोष्ट लक्षात आली की, स्वतंत्र प्राप्तीसाठी आपले जीवन समर्पित करणारे स्वातंत्रवीर यांना मात्र आपण काळाच्या ओघांमध्ये विसरत जात आहोत. आज कित्येक स्वातंत्रवीर आपल्याला माहित नाही. त्यात एक गोष्टीचा आवर्जून उल्लेख करावी की, महिला स्वातंत्र्याविषयी फारच थोड्या अगदी हातावरती मोजण्या इतपत लोकांना त्यांच्याबद्दल माहिती आहे. पुरुष स्वातंत्रसेनानीप्रमाणेच महिला सुद्धा स्वातंत्र चळवळीमध्ये सहभागी होऊन आपले जीवन हे देशासाठी समर्पित केले आहे. भारतामध्ये अशा अनेक स्त्रिया या स्वातंत्र्यासाठी लढल्या आहेत. पण त्यातील काहीच महिलांचा उल्लेख सध्या केला जातो. भारतीय स्वातंत्रलढ्यामध्ये प्रीतीलता वड्डेदार, कल्पना दत्त, कमलादेवी चटोपाध्याय, सावित्रीबाई फुले, कित्तूर राणी चन्नम्मा, विजयालक्ष्मी पंडित, कस्तुरबा गांधी, सरोजिनी नायडू, उदा देवी, भिकाजी कामा अशा अनेक स्त्रियांचा उल्लेख केला जातो.

भारतातील बॉम्बे प्रेसिडेन्सी मधील महिलांच्या योगदानाबद्दल संशोधनात्मक लेखन करताना, सध्या या लेखात मिठुबेन पेटिट, सुमती मोरारजी, मणिबेन पटेल, जयश्री रायजी आणि उषा मेहता या महिलांच्या योगदानाबद्दल महत्त्वपूर्ण माहिती घेण्यात आली आहे. भारतीय स्वातंत्र्यलढ्यात पुरुषांप्रमाणेच महिला ही तितक्यात आघाडीवर होत्या. बॉम्बे प्रेसिडेन्सी मध्ये 1) गुजरात विभाग (मुंबई शहर, अहमदाबाद, भरूच, खेडा, पंच महाल सुरत, ठाणे, कुलाबा, रत्नागिरी) 2) दख्खन विभाग (अहमदनगर,

खानदेश, नाशिक, पुणे, सातारा) 3) कर्नाटक विभाग (बेळगाव, विजापूर, धारवाड, उत्तर कानाडा) 4)सिंध विभाग (कराची, हैदराबाद, शिकापूर, थर आणि पारकर, उत्तर सिंध सीमान्त) हे काही विभाग समाविष्ट होते तर त्याव्यतिरिक्त बॉम्बे प्रांतात 18 संस्थाने समाविष्ट होते. स्त्रियांनीही स्वातंत्र संग्रामात पुढाकार घेतला पाहिजे यासाठी महात्मा गांधीनी आव्हान केले. यातूनच अनेक स्त्रिया पुढे आल्या.

श्रीमती मिठुबेन पेटिट यांचा दांडीयात्रेतील सहभाग असो किंवा सुमती मोरारजी यांनी वयाच्या चौदाव्या वर्षी सांभाळलेली शीप कंपनी, तर मणिबेन पटेल यांचे अनेक सत्याग्रहासाठी दिलेले योगदान आणि जयश्री रायजी यांचे स्त्रियांसाठीचे योगदान उषा मेहता यांनी स्वातंत्रचळवळीसाठी रेडिओवरून केलेले आव्हान हे सर्व आताच्या पिढीला मार्गदर्शक आहे. परंतु या महिला स्वातंत्रसेनानी दिलेले योगदानमात्र काळाच्या ओघात दुर्लक्षित झाले आहे. तरी या संशोधनातून आपणास या महिलांच्या कर्तृत्वाचा अभ्यास केला आहे. 20 व्या शतकात या महिलांनी स्वातंत्रचळवळीत घेतलेला सहभाग हाच एक इतिहास म्हणावं लागेल.

या संशोधनात्मक लेखातून बॉम्बे प्रेसिडेन्सी मधील दुर्लक्षित स्त्रियांचे योगदान स्पष्ट करण्यात आले आहे. आपणास स्त्रियांच्या योगदानाबद्दल, कर्तृत्वाबद्दल, त्यागाबद्दल त्यांच्या कार्याचा महत्त्वपूर्ण आढावा घेण्यात आला आहे.

**मिथुबेन होर्मुसजी पेटिट :**

श्रीमती मिठुबेन पेटिट यांचा जन्म बॉम्बे प्रेसिडेन्सी मध्ये म्हणजेच सध्याचे मुंबई या ठिकाणी श्रीमंत पारसी कुटुंबात झाला. त्यांचे वडील सर दिनेशॉ मानेकजी पेटिट, आईचे नाव साकरबाई पांडे. मिठुबेनचे वडील हे भारतातील एक प्रसिद्ध उद्योगपती होते. मिठुबेन या तरुण असताना त्यांच्यावर त्यांच्या मावशी 'जयजी जहांगीर पेटिट' यांचा प्रभाव होता. त्यांच्यावर गांधी विचारांचा व आदर्शवादाचा प्रभाव होता. गांधीजी दक्षिण आफ्रिकेतून परतल्यानंतर 1915 मध्ये मुंबईत स्थापन झालेल्या राष्ट्रीय स्त्री सभेच्या जयजी बेन सचिव होत्या. मिठुबेन त्यांच्या काकूंसोबत गांधीजींच्या भेटीला जात असत. गांधीजींच्या विचारांचा तत्वांचा व कार्याचा मिठुबेन पेटिट यांच्यावरती प्रभाव पडला.

पुढे मिठुबेन पेटिट या गांधीजींच्या सोबत मिठाचा सत्याग्रह करण्यासाठी सहभागी झाल्या. गांधीजींनी 6 एप्रिल, 1930 रोजी दांडी येथे मिठाचा सत्याग्रह केला. याच सत्याग्रहाची पुनरावृत्ती 9 एप्रिल, 1930 रोजी भामरागड येथे झाली, तेव्हा गांधीजींच्या पाठीमागे 'मिठुबेन पेटिट' या मागे उभे असलेल्या एका छायाचित्रामध्ये पाहायला मिळते. या दांडी यात्रेमध्ये मिठुबेन पेटिट यांना कस्तुरबा गांधी व सरोजिनी नायडू यांचे मार्गदर्शन मिळाले. दांडी यात्रेत पेटिट यांनी कस्तुरबा गांधी व सरोजिनी नायडू यांची समवेत महत्त्वाची भूमिका बजावली. या यात्रेत गांधीजींनी दांडी येथील छावणीचा कारभार मिठूबेनकडे सोपविला होता. यावरून कळते की ज्या काळात महिलांना घरातून बाहेर पडण्याची, स्व: निर्णयाचे अधिकार नव्हते, त्यावेळी मिठुबेन यांनी दांडी यात्रेमध्ये सहभागी होऊन एक इतिहास निर्माण केला. सर्वसामान्य स्त्रियांसाठी हा एक आदर्श ठेवा म्हणावा लागेल. त्या राष्ट्रीय स्त्री सभेच्या सचिवा होत्या. दारू व परदेशी कापड यावर बहिष्कार टाकण्यात श्रीमती पेटिट यांची महत्त्वाची भूमिका होती. सविनय कायदेभंगाच्य दरम्यान त्यांना चार वर्ष तुरुंगवास भोगावा लागला.

मिठुबेन यांनी इ. स 1928 रोजी ब्रिटिश राजवटी विरुद्ध बार्डोली येथे करमुक्त मोहिमेसाठी सत्याग्रह केला. त्यावेळी त्यांना सरदार वल्लभभाई पटेल यांचे मार्गदर्शन लाभले होते. मिठुबेन यांनी क्रांतिकारक चळवळी मध्ये सहभागी झाल्यास परंतु त्यांनी सामाजिक कार्यामध्ये राहून समाजातील अनेकांना समाजप्रवाहामध्ये आणण्याचा प्रयत्न केला. गुजरात मध्ये आदिवासी उद्धाराचे कामं प्रथम मिठुबेन यांनी केले. आदिवासींसाठी आश्रम, राष्ट्रीय शाला, दवाखाने स्थापन केले. मिठुबेन यांनी 1 डिसेंबर, 1930 रोजी मेरोली येथे कस्तुरबा वनात 'शाला' नावाचा आश्रम स्थापन करून मच्छीमार, हरिजन, आदिवासी यांच्या मुलांना विणकाम, सूत कताई, चामड्याचे काम, दुग्ध व्यवसाय इतर उपयुक्त ग्रामोद्योग, याचे शिक्षण तर महिलांना स्वावलंबी बनवण्यासाठी शिवणकामचे शिक्षण दिले. खान अब्दुल गफार खान, सरदार वल्लभभाई पटेल आणि मीराबेहन यांच्या उपस्थितित मध्ये गांधीजींनी शालेचा पाया घातला.

श्रीमती पेटिट यांनी मानसिक मनोरूग्णांलयाची स्थापन केली. 1942 च्या भारत छोडो आंदोलनामध्ये सहभागी झालेल्या लोकांना ब्रिटिश पकडत त्यांना मानसिक, शारीरिक त्रास देत. या आंदोलनात सहभागी झालेल्या लोकांवरती या रूग्णालयात उपचार मिळत असे. मिठुबेन पेटिट या रुग्णांची सेवा अगदी आई प्रमाणे करत असत त्यामुळे त्यांना 'माईजी' असे संबोधले जात. मिठुबेन पेटिट यांच्या निर्मळ, प्रेमळ स्वभावामुळे त्यांना अनेक लोक भेटण्यास येत. त्रेचाळीस वर्षांच्या नि: स्वार्थ सेवेत मिठुबेन कधीही आपल्या तत्त्वांपासून विचलित झाल्या नाहीत. त्यांनी दिलेल्या सामाजिक कार्यासाठी भारत सरकारने 19 61 मध्ये पद्मश्री पुरस्कार देऊन गौरवण्यात आले आहे. वयाच्या 81 व्या वर्षी 16 जुलै, 1973 रोजी त्यांचा मृत्यू झाला.

**सुमती मोरारजी:**

13 मार्च 1909 रोजी मुंबईतील एका श्रीमंत परिवारात सुमतीबाई मोरारजी जन्मल्या. वडील मथुरादास व प्रेमाबाई ह्या त्यांच्या आई होतं. त्यांनी जन्मलेल्या या अपत्याचे नाव कृष्णाशी संबंधित पवित्र नदीवरून जमुना असे ठेवले होते. तत्कालीन परंपरेनुसार त्यांचा विवाह बाल वयात झाला.

सिंधीया स्टीम नेव्हिगेशन कंपनीचे संस्थापक नरोत्तम मोरारजी यांचा एकुलता एक पुत्र शांतीकुमार मोरारजी यांच्याबरोबर सुमती यांचा विवाह झाला. किशोरवयीन जमुनीची कुशल बुद्धी पाहून नरोत्तम यांनी आपल्या सुनेचे नाव सुमती असे ठेवले.(अर्थ: श्रेष्ठ बुद्धी असलेली स्त्री) तदनंतर जमुनाचे नाव सुमती असे झाले. त्यांना लहान वयातच मराठी, हिंदी व इंग्रजी भाषा अवगत होत्या. विवाहापश्चात सुमती ह्यांनी 14 वर्षाचे असल्यापासून कंपनीच्या व्यवस्थापन सहभाग घ्यायला सुरुवात केली. कंपनीचे संपूर्ण कार्यभार 1946 पर्यंत सुमतीबाई यांनी हाताळला. एकूण 43 जहाज नौका त्यांच्या देखरेखीखाली ताफ्यामध्ये आले. जहाज व्यवसायातील विस्मयकारक पराक्रमामुळे भारतीय राष्ट्रीय स्टीमशीप मालकी संघटनेच्या अध्यक्षपदी 1956 आणि 1965 साली त्यांची नियुक्ती झाली.

भारत सरकारने 1979 ते 87 पर्यंत ही कंपनी आपल्या ताब्यात घेतली, पण तोवर सुमती ह्या जवळजवळ तीन कंपनीचे अध्यक्षपद भूषवित होत्या. नरोत्तम मोरारजी आणि इतर गुजराती मित्र वालचंद हिराचंद आणि किलाचंद देवचंद यांसोबत एकत्रित येऊन The Sindhiya Steam navigation company limited. ची स्थापना केली. यातूनच एप्रिल 1919 ला सिंधियांचे पहिले जहाज SS LOYALTY तयार झाले. हे भारतातील पहिले स्वदेशी जहाज म्हणावे लागेल. हे जहाज मुंबईहून – यूनायटेडला रवाना झाले व आंतरराष्ट्रीय सागरी भागात भारतीय नौकायनाचा ध्वज फडकला. हाच वारसा पुढे सुमती मोरारजी यांनी नेला.

सुमती मोरारजी या गांधीवादी विचारसरणीच्या पुरस्कर्त्या होत्या. तसेच त्या नेहमीच महात्मा गांधीच्या संपर्कात राहिल्या कारणाने त्यांच्यातील देवाणघेवाणाच्या बातम्या समाचार पत्रातून आलेल्या पाहायला मिळतात. जवळच्या मैत्रिणींप्रमाणेच गांधीनी यांना वागणूक दिली. 1942 ते 46 मध्ये भूमिगत राहून सुमती यांनी गांधीजींसोबत सहभाग दर्शवला. ज्यावेळी गांधीजींना अटक केली गेली, तेव्हा तुरूंगात जाऊन शांतीकुमार व इतर जवळच्या लोकांना गांधीची गाठ घेण्याची अनुमती होती. कस्तुरबा गांधीच्याच देहांतवासानंतर गांधीची आगाखान्यातून मुक्तता केली गेली. त्यानंतर गांधी हे शांतीकुमार मोरारजी यांच्या बंगल्यावर अनेक महिने स्थित होते. त्यावेळी सुमती मोरारजी यांना गांधीजींचे जवळून मार्गदर्शन लाभले. गांधी समवेत सरोजिनी नायडू व विजयालक्ष्मी पंडित या सुद्धा वास्तव्यास होत्या.

हिंदूस्थानच्या इतिहासातील वाईट प्रसंग म्हणून पाहिल्या जाणाऱ्या फाळणीच्या वेळी गांधीजींच्या म्हणण्यांनुसार सुमती यांनी कराची मधील लोकांना सुरक्षितरीत्या भारतात आणण्यासाठी वाफेवरील जहाज रवाना केले होते. या कार्यात सुमती मोरारजी यांचा महत्त्वपूर्ण वाटा होता. तसेच भारत छोडो आंदोलनातही त्या सक्रियपणे सहभागी होत्या. त्यांचा दादाभाई नौरोजी, रवींद्रनाथ टागोर, अँनी बेझंट व सरोजिनी नायडू आणि म. गांधी यांसोबत त्यांचा जवळीक संबंध होता.

सुमती मोरारजी प्रायोजित पॉल झील्स या जर्मन दिग्दर्शकाच्या मार्गदर्शनाखाली 'राष्ट्रीय शिपिंगसाठी भारताचा संघर्ष' यावर चित्रपटाची निर्मिती केली व भारताचा स्वातंत्र्याचा उत्सव साजरा करण्यासाठी पंडित नेहरूंच्या प्रेरणेने हा चित्रपट तयार

करण्यात आला. हा चित्रपट भारतीय स्वातंत्र्याच्या आठवड्यात प्रदर्शित करण्यात आला. 1947 नंतर भारतीय व्यापाराला चालना देण्यासाठी आयात – निर्यात सुलभ होण्यासाठी सुमातीजीच्या कौशल्याचा व अनुभवाचा भारतीय व्यापरला मदत झाली.

त्यांच्या या कार्याचा आढावा घेऊन भारत सरकारने भारतातील दुसऱ्या क्रमांकाचे सर्वोच्च पदक ‘पद्मविभूषण’ देऊन सन्मानित केले. 27 जून 1998 रोजी वयाच्या 89 व्या वर्षी सुमती मोरारजी यांनी अखेरचा श्वास घेतला. त्या खाऱ्या अर्थाने ‘मदर ऑफ इंडियन शिपिंग’ होत्या.

**मणिबेण वल्लभभाई पटेल:**

श्रीमती मणिबेन पटेल म्हणजे भारतीय स्वातंत्र्यसंग्रामातील पोलादी पुरूष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या कन्या. बॉम्बे प्रेसिडेन्सी मधील गुजरात येथील करमसद येथे ब्रिटिश भारतात मणिबेन यांचा 3 एप्रिल, 1903 रोजी जन्म झाला. लहानपणीच वयाच्या अगदी सहाव्या वर्षी त्यांचे मातृछत्र हरपले. पुढे त्यांचे पालनपोषण वल्लभभाई पटेल यांचे जेष्ठ बंधु विठ्ठलभाई यांनी केले. मुंबई मधील क्वीन मेरी विद्यालयात त्यांनी प्राथमिक शिक्षण घेतले, तर पदवीचे ज्ञान हे गांधीजींनी स्थापन केलेल्या राष्ट्रीय विद्यापीठात पूर्ण केले. वयाच्या बावीसाव्या वर्षापासून त्यांनी आपल्या वडीलांना स्वातंत्र्यसंग्रामातील मदतीसाठी सक्रिय सहभाग नोंदवला. महात्मा गांधींचे मणिबेन यांना महत्त्वपूर्ण असे योगदान लाभले. 1925 नंतर मणिबेन या स्वातंत्रचळवळीत सक्रिय सहभागी झाल्या.

श्रीमती मणिबेण यांनी महात्मा गांधीच्या मार्गदर्शनाखाली असहकार चळवळ, मिठाचा सत्याग्रह यात सक्रिय सहभाग घेतला अनेकवेळा त्यांना कैद करण्यात आली. त्यांची कार्याचा आढावा घेताना बरसोदा आंदोलन, बारडोली सत्याग्रह, राजकोट सत्याग्रह यांसारख्या घटनेचा आवर्जून उल्लेख केला पाहिजे.

**बरसोदा आंदोलन :-**

इंग्रज शासनाने इ. स 1923 - 24 या काळात सामान्य भारतीय लोकांवर मोठ्या प्रमाणावर कर बसवले होते व या कर वसुलीसाठी सर्वसामान्य जनतेच्या जमिनी व गुरांवर जप्ती आणली जात असल्याने या दडपशाही विरूद्ध 'मणिबेन पटेल' यांनी अत्याचाराच्या निषेधार्थ स्त्रियांमध्ये जनजागृती केली आणि त्यांना स्वतंत्रता संग्राम मोहिमेत सहभागी व्हावे यासाठी प्रोत्साहित केले. त्याच बरोबर NO – TAX चळवळीला पाठिंबा देण्यास प्रेरित केले.

**बारडोली सत्याग्रह :-**

सूरत जिल्ह्यातील, बारडोली या तालुक्यात ब्रिटिश सरकारने शेतकऱ्यांवर जुलूमी कर लागू करून आकारणी केली होती. सरदार पटेल यांनी गांधीच्या म्हणण्यांनुसार सत्याग्रहाचे नेतृत्व केले, या सत्याग्रहाचे मुख्य विशेष म्हणजे त्याकाळत या सत्याग्रहात महिलांची संख्या ही पुरूषांपेक्षा अधिक प्रमाणात होती. मणिबेन पटेल, भक्तिबा देसाई आणि मिठुबेन पेटिट ह्या महिला आघाडीवर होत्या. शासनाद्वारा जप्त करण्यात आलेल्या जमिनीवर सत्याग्रहातील महिला झोपडी बांधून राहिल्या. पटेल यांच्या कुटुंबातून तीन जण या सत्याग्रहात सक्रियपणे सहभागी होते, ते म्हणजे वल्लभभाई पटेल, विठ्ठलभाई पटेल व सरदार पटेल यांची कन्या मणिबेन पटेल. या सत्याग्रहापासूनच वल्लभभाई पटेल यांना ‘सरदार’ हे नाव प्राप्त झाले.

**राजकोट सत्याग्रह :-**

बॉम्बे प्रेसिडेन्सी मधील गुजरात प्रांतातील राजकोट येथे इ.स. 1938-39 मध्ये दिवाणाच्या अन्यायकारक शासनाविरूद्ध श्रीमती मणिबेन यांनी राजकोट येथे सत्याग्रह केला. हा सत्याग्रह पश्चिम भारतातील संस्थानामधील एक महत्त्वाचा सत्याग्रह मानला जातो. तब्यात अस्वस्थ असताना सुद्धा कस्तुरबा गांधीही या सत्याग्रहात सहभागी होत्या. शासनाने मणिबेन व कस्तुरबा यांना अटक करण्याचे आज्ञा देताच मणिबेन यांनी त्याविरूद्ध उपोषण केले शेवटी इंग्रज अधिकाऱ्याला कस्तुरबा सोबत एकत्र यायला अनुमती दिली.

**असहकार चळवळ :-**

भारत छोडो आंदोलन व अन्य स्वातंत्र प्राप्ती च्या चळवळीत सहभागी घेतल्याने 1942 ते 1945 पर्यंत मणिबेन यांना पुण्यातील येरवडाच्या तुरूंगात ठेवण्यात आले. त्यांनी तुरूंगात नेहमीच्या कडक नित्यक्रमाचे पालन केले. पहाटे प्रार्थना करणे

त्यानंतर सूत कातणे, वाचणे, आजारी कैद्यांची काळजी घेणे. केवळ तिचेच नव्हे तर इतर कैद्यांचे कपडे देखील धुणे अशी कामे मणिबेन या आनंदाने करत. इतर स्वातंत्र्यसंग्रामातील त्या उत्स्फूर्तपणे सहभागी होत्या, तसेच आपल्या वडिलांची वैयक्तिक देखभाल करत. सरदार पटेल मेमोरियल ट्रस्ट साठी पुढे त्यांनी कार्य केले. त्या खादीचेच वस्त्र परिधान करत व प्रवास वेळी तिसऱ्या वर्गातून प्रवास करीत. यावरून त्यांच्या साधारण रहाणीमानाची प्रचिती येते.

1952 ते 1962 या काळात मणिबेन लोकसभेच्या आणि 1964 ते 1970 पर्यंत राज्यसभेच्या सदस्य, सक्रिय सदस्य होत्या. त्या अनेक सामाजिक आणि सामाजिक कार्यांशी जोडल्या गेल्या होत्या. दैनंदिन घडामोडींची डायरीमधून आपणास बोरसद आणि बारडोली सत्याग्रहाचा अस्सल अहवाल प्राप्त होतो. मणिबेन पटेल यांनी वडीलांनी दिलेल्या शिकवणूक आचरण आणून आपले आयुष्य राष्ट्राला समर्पित केले. 26 मार्च 1990 रोजी त्यांचे निधन झाले.

**जयश्री नैशाध रायजी :**

जयश्री रायजी स्वातंत्र्यसेनानी होत्या, त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य त्यांनी हिंदुस्तानींसाठी वेचले. दलित व गरीब लोकांसाठी विशेष त्यांनी पुढाकार घेतला. साहाय्य मागायला येणाऱ्या प्रत्येक व्यक्ती करिता जयश्री बाईच्या घरचे दरवाजे सदैव खुले असायचे. काही माणसांचा जन्म काही विशिष्ट गोष्टींसाठी होतो, त्याप्रमाणे जयश्री देखील होत्या. त्यांनी कधीच कुठल्याही बक्षीस अथवा प्रसिद्धीची उम्मीद ठेवली नाही. मानव सेवा हीच ईश्वरसेवा या तत्वानुसार व गीतेपदेशाला सर्वोच्च स्थानी ठेवून त्या सदैव जगत असत.

26 ऑक्टोबर, 1815 रोजी सुरत येते जयश्री यांचा जन्म झाला. बडोद्याचे दिवाण सर मुनभाई मेहता यांची त्या कन्या होय तर गुजराती लेखक नंदशंकर मेहता यांची नात. जयश्री या हंसाबेन मेहता यांच्या जेष्ठ भगिनी होय. त्यांनी उच्च शिक्षण बडोदा महाविद्यालयातून पूर्ण केले. त्यांनी तत्वज्ञानची पदवी प्राप्त केली. इ. स 1918 मध्ये एन. एम. रायजी या चार्टर्ड अकाउंटंटशी जयश्री विवाहबद्ध झाल्या व ते मुंबईला स्थलांतरित झाले. मुंबईत आल्यावर त्यांनी स्वतःला पूर्णपणे समाज कार्यात गुंतवून घ्यायचा निश्चय केला. स्त्रीयांना बढती देणे, त्यांना योग्य ते प्राधान्य मिळवून देणे हेच त्यांच्या जीवनाचे लक्ष्य स्वीकारले. लहान बालके व मागास प्रवर्गातील लोकांच्या कल्याणाची फार फिकीर त्यांना वाटत असे. मुंबई सिनेट विद्यापीठाच्या त्या सदस्य देखील जयश्री होत्या. 1930 मध्ये, हिंदुस्थान च्या स्वातंत्र्यसंग्रामात त्यांना सामिल होण्यासाठी आमंत्रित केले होते. तेव्हा तिने स्वत:ला देश सेविका म्हणून संबोधित केली. गांधीजींनी स्त्रीयांना केलेल्या आवाहनाने जयश्री या प्रेरित झाल्या होत्या. जेव्हापासून जयश्री महात्मा गांधींच्या शिकवणीच्या प्रभावाखाली आल्या तेव्हापासून साधेपणा ही त्यांची जीवनशैली बनली. खादी वस्त्र परिधान करणे, साधेपणाने राहणे ही जणू त्यांची जीवनशैलीच बनलेली होती, जेव्हा त्या गांधीच्या प्रभावाखाली आल्या. तसेच जवळ असलेली सर्व दागदागिने तिने विकून टाकले. स्वातंत्रसंग्रामात आपले अमूल्य असे योगदान दिले.

स्वातंत्र्यलढ्यात त्यांनी सक्रियपणे सहभाग घेतला म्हणून 1932 च्या सुरुवातीस, त्यांना त्यांच्या निवासस्थानातून अटक करण्यात आली त्यांना पोलिसांनी पकडून आयुक्तांसमोर हजर केले. तेव्हा त्यांची धाकटी कन्या अवघ्या तीन वर्षाची होती. सविनय कायदेभंगाच्य चळवळीत सक्रिय भाग घेतल्याबद्दल जयश्री यांना अटक करण्यात आली होती, “स्वातंत्र्याच्या चळवळीत परत सहभागी न होण्याची शपथ जर त्यांनी घेतली तर त्यांची लगेच मुक्तता करण्यात येईल अन्यथा जयश्री रायजी यांना कारावास भोगावा लागेल, तसेच बाळाला सोबत ठेवायला दिले जाणार नाही” असे आयुक्तांनी फर्मावले असता त्यांनी माघार घेतली नाही. बाळाला आपल्या बहिणीकडे सोपवून त्या शिक्षेसाठी सामोऱ्या गेल्या. पुढे त्यांची सुटका करण्यात आली. स्वातंत्र्य संग्रामातील शांततेच्या काळात, जयश्री समाज कल्याणाच्या कामात अधिक वेळ देऊ शकल्या. 9 ऑगस्ट 1942 रोजी भारत छोडो आंदोलनात अनेक प्रमुख नेत्यांच्या अटकेनंतर लोक हिंसक झाले होते तेव्हा बॉम्बे कॉंग्रेसच्या महिला शाखेच्या प्रमुख या नात्याने जयश्री यांनी नेत्यांच्या अटकेच्या ठीक एक महिन्यानंतर 9 सप्टेंबर 1942 रोजी महिलांची सामूहिक मिरवणूक काढली. या मोर्चाच्या प्रथम स्थानी जयश्री रायजी होत्या.

जयश्री या एक उत्तम सामाजिक कार्यकर्त्या होत्या ,पण स्वातंत्र्यानंतर त्यांना नकळत राजकारणात ओढल्या गेल्या. इ. स 1952 साली झालेल्या पहिल्या निवडणुकीत जयश्री रायजी विजयी झाल्या होत्या. संसदेतही त्यांनी महिला व मुलांच्या

हिताबाबत आवाज उठवला. महिलांसाठी त्यांनी विशेष पुढाकार घेऊन प्रयत्न केले. जरठ विवाह, बालविवाह, घरच्याच महिलांना गुलाम बनविणे, हुंडाबंदीसाठी वगैरे त्यांनी तीव्र विरोध दर्शवला. हिंदू कोडिफिकेशन कायद्यावर वादविवाद चालू असताना त्यांनी आपल्या खासदारकीचा राजीनामा दिला. लोकसभेतील त्यांचा कार्यकाळ संपल्यानंतर जयश्री यांनी पुन्हा निवडणूक लढवली नाही त्यांनी आपले जीवन सामाजिक कार्यासाठी व्यतीत केले. शेवटी 1985 मध्ये वयाच्या 85 व्या वर्षी त्यांचा मृत्यू झाला.

**उषा मेहता :**

आज गुजरात म्हणून ओळखल्या जाणाऱ्या राज्यातील सुतेच्या जवळ असणाऱ्या सारस या गावात उषाबेन मेहता यांचा जन्म 24 फेब्रुवारी 1920 रोजी झाला. त्यांच्या वडील हरिप्रसाद मेहता तर आई घेलीबेन मेहता होय. वयाच्या अवघ्या 5 वर्षाचे असताना त्यांनी महात्मा गांधींच्या अहमदाबाद येथील आश्रम पहिला होता. त्या एकदा वानर सेनेच्या इतर लहान मुलांसोबत पोलीस बंदोबस्तात सापडल्या होत्या . 1928 मध्ये सायमन कमिशन विरोधी निषेध मोर्चा मध्ये अवघे 8 वर्षांचे असतानाही त्यांनी आपला सहभाग नोंदवला. इंग्रज सरकारविरुद्ध त्यांचे सायमन गो बॅक असे पहिले शब्द ओरडले. वेळोवेळी दारूच्या दुकानासमोर ठिय्या आंदोलनही केले. उषा यांना पित्याकडून स्वातंत्र्यलढ्यात सहभागी व्हायची अनुमती नव्हती, कारण त्यांचे वडील हे इंग्रजी राजवटीत न्यायाधीश म्हणून कार्यरत होते.

1930 साली वडील सेवानिवृत्त झाले आणि 1932 साली जेव्हा उषाताई मेहता यांचा सगळा परिवार मुंबई (बॉम्बे) येथे स्थायिक झाले, तेव्हा कुठे त्यांना स्वातंत्र्य कार्यात व्यवस्थितपणे सहभागी होणे शक्य झाले. त्यातून गुप्तरित्या प्रकाशने व बुलेटिन वितरित करणे व तुरूंगातील नातेवाईकांना भेट देणे, तेथील स्वातंत्र्याकरिता झगडणाऱ्या कैदी असलेल्या व्यक्तींना गुप्तपणे संदेश पोहचवणे अशा कार्यातून त्यांनी स्वातंत्रप्राप्तीसाठी हात पाय हलवण्यास सुरूवात केली. महात्मा गांधींच्या प्रभावाखाली उषा मेहता वाढल्या. त्यामुळे गांधींच्या अनुयायांपैकीच त्यासुद्धा एक बनल्यामुळे जीवनभर त्यांनी ब्रम्हचारी राहण्याचा निर्धार केला. सर्व चैनीच्या वस्तूंपासून दूर राहून व नेहमीच खादीच्या वस्त्राचा वापर अशा प्रकारे त्यांनी गांधीवादी जीवनशैली स्वीकृत केली. गांधीवादी तत्त्वज्ञान व विचारांचे प्रमुख समर्थक म्हणून कालांतराने त्या प्रकाशझोतात आल्या.

वयाच्या 22 व्या वर्षापासून उषाबेन यांनी पूर्णपणे स्वातंत्र्य चळवळींसाठी कार्यरत राहण्यावर भर दिला. उषा मेहता यांनी 1939 ला तत्त्वज्ञान विषयात प्रथम श्रेणीची पदवी प्राप्त केली. त्यांना इंग्रजी, गुजराती, हिंदी आणि मराठी भाषा येत होत्या. पुढे त्यांनी विधी शाखा म्हणजेच कायद्याचा अभ्यासही सुरू केला, परंतु 1942 मध्ये छोडो भारत आंदोलनात सहभागी होण्यासाठी पूर्ण अभ्यास थांबवला.

गोवालिया टँक मैदानावर मुंबईत महात्मा गांधी व कॉंग्रेस यांनी 9 ऑगस्ट 1942 ला समूहाने भारत छोडो यात्रा सुरू होईल अशी घोषणा केली होती. त्यावेळी सर्व नेत्यांबरोबरच महात्मा गांधींनाही अटक केली गेली होती. पण त्याउलट ठरलेल्या त्या दिवशी गोवालिया टँक मैदानावर भारतीयांची मोठ्या प्रमाणावर गर्दी जमली होती. त्या जनतेला संबोधित करणे व निशाण फडकवण्याची जबाबदारी ही कार्यकर्ते व नेत्यांच्या सोडली होती. उषा आणि त्यांचे जवळचे काही सहकार्यानी एक गुप्त कॉंग्रेसची आकाशवाणी आणि गोपनीयतेने नभोवाणी केंद्र 14 ऑगस्ट 1942 ला सुरू केले आणि 27 ऑगस्ट रोजी ते प्रसारित करण्यात आले. अंडरग्राउंड रेडिओ चालवण्याच्या कल्पनेवर आधारित उषा मेहता या कदाचित संघातील सर्वात तरुण होत्या. त्यांच्या आवाजातील पहिले विधान होतो, "हा कॉंग्रेसचा रेडियो आहे, जो भारतातील कुठूनतरी {42. 34 मीटरच्या तरंगलांबी} वर कॉल करतो." हा आवाज होता उषा मेहता यांचा.

कॉंग्रेसच्या गुप्त नभोवाणी केंद्राला म्हणजेच सिक्रेट रेडिओला राम मनोहर लोहिया यांसह अनेक नेते मंडळी डॉ. अच्युतराव पटवर्धन व पुरूषोत्तम त्रिकमदास यांनी सहाय्य केले, तर विठ्ठलभाई व चंद्रकांत झवेरी, बाबूभाई ठक्कर आणि शिकागो आकाशवाणीचे नानका मेटवानी यांनी तंत्रज्ञ व उपकरणे पुरविली. इतर नेते व महात्मा गांधी यांचे ध्वनिमुद्रित केलेले संदेश आकाशवाणीद्वारा प्रसारित करण्यात आले. अटकेतून सुटलेल्या आणि भूमिगत झालेल्या काही स्वातंत्रसैनिकांशी, लोकांशी संपर्क साधण्याचे आणि भविष्यातील कृतीबद्दल सल्ला देण्याचे एक सोयीचे साधन होते. आकाशवाणी केंद्राचे स्थान दररोज

आयोजकांना हलवावे लागले, इंग्रज अधिकाऱ्यांपासून बचाव करण्यासाठी... अखेर 12 नोव्हेंबर 1942 ला ब्रिटिशांनी त्यांना शोधले व उषा मेहता व त्यांच्या आयोजकांना कारागृहात डांबण्यात आल. भारतीय गुन्हे अन्वेषण विभागाच्या द्वारे तब्बल 6महिने तिची पूर्ण चौकशी करण्यात आली. तिला एकटेपणात ठेवण्यात आले. जर चळवळी बरोबर दगा केला तर परदेशात शिक्षण घेण्याची संधी देऊ असे आश्वासन दिले. त्यावेळी तिने मौन पाळणे योग्य समजले. त्यानंतर जेव्हा उषाबेन यांचा न्यायालयात खटला सुरू होता त्यावेळी त्यांनी 'न्यायाधीशांच्या प्रश्नाला जवाब दिलाच पाहिजे का ? असे विचारले. न्यायाधीशांनी याची पुष्टी केली की अनिवार्य, तेव्हा त्या म्हणाल्या की, स्वतःला वाचवायच असलं तरीही मी प्रश्नांची उत्तरे देणार नाही. तो खटला संपल्यावर तिला 1942 ते 46 चार वर्षाची कारावासाची शिक्षा ठोठावली गेली. तिच्या दोन सहकार्यांनाही दोषी ठरवले गेले. पुण्यातील येरवडा तुरूंगात उषा मेहता कैद असताना त्यांची प्रकृती व अस्वास्थ्यामुळे तिला मुंबईतील रूग्णालयात उपचारासाठी सोडण्यात आले. रुग्णालयातून पसार होऊ नये म्हणून तीन- चार पोलीसांतर्फे त्यांच्यावर कडी नजर ठेवली गेली. तब्येत पूर्णपणे बरी झाल्यावर तिला पुन्हा तुरूंगात ठेवण्यात आले.

स्वातंत्र्य चळवळीतील बरेच नेते लोक हे सीक्रेट काँग्रेस रेडिओमुळे जनसंपर्कात राहिले. उषा मेहता यांनी या रेडिओ मधील तिचा सहभाग हा 'उत्तम क्षण' असे वर्णन केले..

शेवटी त्यांच्या योगदानाबद्दल भारत सरकारने त्यांना 1998 मध्ये पद्मविभूषण पुरस्कार प्रदान केला. त्यांच्या आयुष्यातील शेवटची 20 वर्षे मुंबई गांधी स्मारक निधी आणि मणिभवन गांधी संग्रहालयाच्या सेवेसाठी समर्पित होती, शेवट पर्यंत त्या गांधीवादी म्हणून जगल्या. उषा मेहता यांनी वयाच्या 80 व्या वर्षी 11 ऑगस्ट, 2000 रोजी अखेरचा निरोप दिला.

**निष्कर्ष :**

भारतीय स्वातंत्र्य लढ्याचा अभ्यास करताना प्रकर्षाने जाणवणारी गोष्ट म्हणजे बॉम्बे प्रेसिडेन्सीमधील महिलांचा उस्फुर्त प्रतिसाद होय. भारतीय स्वातंत्र्यलढा हा कोणा एका वर्गाने दिलेल्या योगदानापुरता मर्यादित नव्हता तर तो संघटीतरित्या लाखो भारतीयांनी स्वातंत्र्यासाठी केलेला प्रयत्न होता. यामध्ये नेतृत्व करणाऱ्या लोकनेत्यांबरोबरच सर्वसामान्य महिला, शेतकरी, कामगार व अनेक बहुजन अनुयायांच्या बलिदानाची माहिती समाजातील सर्वांना होणे गरजेचे आहे. यापैकी अनेक स्वातंत्र्य सैनिक अजूनही आपणास अपरिचित आहेत त्यांच्या कार्याची माहिती सर्वश्रुत होणे गरजेचे आहे. शेवटी इतकेच म्हणावे वाटते ते म्हणजे मिठुबेन पेटिट, सुमती मोरारजी, मणिबेन पटेल, जयश्री रायजी आणि उषा मेहता यांनी गांधीजींच्या तत्वज्ञानाचा व मूल्यांचा अवलंब करून आपले जीवन क्रांतीकार्यास समर्पित केले.

**संदर्भ सूची:**

1) Sushil Nayar, Kamla Mankekar (2002), Women Pioneers In India's Renaissance, National Book Trust, India

2) डॉ. एस. एस गाठाळ (2013), भारतीय इतिहातील स्त्रिया व स्त्री जीवन, कैलास पब्लिकेशन्स, प्रथमावृत्ती, औरंगाबाद.

3) प्रा. डॉ. पद्मजा पाटील, प्रा. डॉ. शोभना जाधव (2007), भारतीय इतिहासातील स्त्रिया, फडके प्रकाशन, प्रथमावृत्ती, कोल्हापूर.

4) डॉ. एस आर. कट्टीमनी (2019) आधुनिक महाराष्ट्रातील समाजसुधारणा व समाजसुधारक, ए. बी. एस पब्लिकेशन, प्रथमावृत्ती, आशापुर, सारनाथ, वाराणसी.

5) खडपेकर विनया (1991), स्त्री स्वातंत्र्यवादिनी , विसाव्या शतकातील परिवर्तन, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

6) डॉ. बी. आर. बारड (2016 ), भारत के महान क्रांतिकारी, रावत प्रकाशन, दिल्ली.